नवराष्ट्र
www.navarashtra.com

# ‘सायबर शिक्षा’च्या क्लब ऑफिसर्ससाठी निवड

## जे. एम. पटेल महाविद्यालयाचे विद्यार्थी

**भंडारा,** ब्युरो. येथील जे. एम. पटेल महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र विभागातील 4 विद्यार्थ्यांची क्विक हिल फाउंडेशनच्या ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा’ या राष्ट्रीय अभियानासाठी क्लब ऑफिसर्स म्हणून निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये वृषांक लांडगे (प्रेसिडेंट), जय धनरे (सेक्रेटरी), उत्कर्ष गणवीर (ऍक्टिव्हिटी डायरेक्टर), विजय लांजेवार (पी.आर. मीडिया डायरेक्टर) यांचा समावेश आहे.

या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण व ओरिएंटेशन पुणे येथील विमान नगर येथील क्विक हिल कंपनीच्या मुख्य कार्यालयात पार पडले. यावेळी अजय शिर्के व गायत्री पवार यांनी सायबर गुन्हेगारी, प्रतिबंधात्मक उपाय व सायबर सुरक्षेची मुलभूत माहिती दिली. क्विक हिल फाउंडेशनच्या चेअरपर्सन अनुपमा काटकर यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व सायबर सुरक्षेबाबत जनजागृतीचा संदेश समाजात पोहोचविण्याचे आवाहन केले.

महाविद्यालय आणि फाउंडेशन यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराअंतर्गत हे विद्यार्थी पुढील काही आठवडे शाळा, महाविद्यालये व सार्वजनिक ठिकाणी जाऊन सायबर सिक्युरिटी अवेअरनेस उपक्रम राबवतील. समाजात सायबर सुरक्षेची जाणीव निर्माण करण्याची संधी मिळणार आहे. यासोबतच, “कमवा आणि शिका” उपक्रमांतर्गत त्यांना आर्थिक मदतीची तरतूद करण्यात आली. प्रभारी प्राचार्य डॉ. प्रदीप मेश्राम यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करीत त्यांच्या सशक्त कार्याबद्दल शुभेच्छा दिल्या. उपक्रमासाठी संगणक विभागप्रमुख डॉ. प्रवीण घोसेकर, तसेच प्राध्यापक डॉ. सबाह नसीम, प्रा. पलाश फेंद्वार, प्रा. प्रियंका शर्मा आणि प्रा. फरीना शेख यांनी मार्गदर्शन व मेहनत घेतली.

Bhandara Plus Edition
Jul 19, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com